# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## स.नं.८३२ ए, फायनल प्लॉट नं. १७८ व १७९,
## आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
## पुणे – ४११ ००४.

## कनिष्ठ लिपिक संवर्गासाठी पदभरती जाहिरात सन २०१९
## (Detail Advertisement)

सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे – ४११००४ यांना नोडल अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेल्या प्राधिकारानुसार,

| | | | |
|---|---|---|---|
| १ | राज्यमंडळ, पुणे, | २ | पुणे विभागीय मंडळ, पुणे, |
| ३ | नागपूर विभागीय मंडळ, नागपूर | ४ | औरंगाबाद विभागीय मंडळ, औरंगाबाद |
| ५ | मुंबई विभागीय मंडळ, नवी मुंबई वाशी | ६ | कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर |
| ७ | अमरावती विभागीय मंडळ, अमरावती | ८ | नाशिक विभागीय मंडळ, नाशिक, |
| ९ | लातूर विभागीय मंडळ, लातूर | १० | कोकण विभागीय मंडळ, रत्नागिरी. |

या कार्यालयांमध्ये रिक्त असलेल्या **कनिष्ठ लिपिक** संवर्गाची पदे विहित शैक्षणिक/तांत्रिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधून भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरीक्षा पोर्टल यांचेमार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे तसेच, सदर जाहिरात मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- अर्जाचे व परीक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | दि. १६/०९/२०१९ (सायंकाळी ६.०० पासून) ते दि. ०६/१०/२०१९ (रात्री ११.५९ पर्यंत) |
| २. | प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन प्रिंट काढून घेणे. | महापरीक्षा पोर्टलवर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल. |
| ३. | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | महापरीक्षा पोर्टलवर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल. |

भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना, वगैरे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

पदनाम – कनिष्ठ लिपिक

वेतनश्रेणी :- एस-६ (रु.१९,९००-६३,२००)

भरावयाची पद संख्या :- २६६

| जात प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | माजी सैनिक | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | -- | ३० | ५ | २ | १५ | ५ | १० | १ | -- |
| अ.जा. | ३६ | ११ | २ | १ | ५ | २ | ४ | ० | ११ |
| अ.ज. | १६ | ५ | १ | ० | ३ | १ | २ | ० | ४ |
| विजा-अ | ६ | २ | ० | ० | १ | ० | १ | ० | २ |
| भज-ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-क | १२ | ३ | १ | ० | २ | १ | १ | ० | ४ |
| भज-ड | ५ | २ | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| वि.मा.प्र. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| इ.मा.व. | ४७ | १४ | २ | १ | ७ | २ | ५ | ० | १६ |
| एसईबीसी | ३५ | ११ | २ | १ | ५ | २ | ३ | ० | ११ |
| ईडब्ल्युएस | २७ | ८ | १ | १ | ४ | १ | ३ | ० | ९ |
| अराखीव | ८१ | २४ | ४ | १ | १२ | ४ | ८ | ३ | २५ |
| एकूण | २६६ | ८० | १३ | ५ | ४० | १३ | २७ | ३ | ८५ |

टिप- वरील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या २६६ पदांपैकी ११ पदे दिव्यांग प्रवर्गासाठी राखीव आहेत. सदर पदांवर अंध/अल्पदृष्टी-२ किंवा ३, कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता-२ किंवा ३, अस्थीव्यंगता/मेंदुचा पक्षघात/कुष्ठरोग मुक्त/शारीरिक वाढ खुंटणे/आम्ल हल्लाग्रस्त/स्नायु विकृती-२ किंवा ३, बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असलेले-२ किंवा ३ (गुणानुक्रमे) उमेदवार निवडीस पात्र राहतील.

उपरोक्तप्रमाणे सदर पदावर निवड करताना उमेदवार दिव्यांग असल्यास फक्त **One Arm (OA), One Leg (OL), One Leg One Arm (OLA), Both Legs (BL), Blind (B), Low Vision (LV). Hearing Handicapped(HH). Cerebral Palsy, Leprosy Cured, Dwarfism, Acid Attack Victim, Muscular Dystrophy** इत्यादी प्रकारातील उमेदवार नियुक्तीसाठी पात्र राहतील.

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २९/०५/२०१९ मधील तरतूदीच्या अनुषंगाने दिव्यांगाकरीता मंडळाने सुनिश्चित केलेल्या धोरणानुसार कनिष्ठ लिपिक पदासाठी स्वमग्नता/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता/विशिष्ट शिक्षण अक्षमता/मानसिक आजार या दिव्यांग प्रकारातील उमेदवार पात्र राहणार नाहीत.)

(१) स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांना राहतील तसेच, उपरोक्तप्रमाणे दि.३१/१२/२०१९ पर्यंतची रिक्त पदे भरावयाची असून, संदर्भित पात्र उमेदवारांची निवड यादी जाहिर झाल्यानंतर उमेदवारांना उपलब्ध होणाऱ्या पदावर गुणानुक्रमानुसार प्रथम नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यास अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, हे सक्षम राहतील आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

दिव्यांग व माजी सैनिकांच्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन तरतूदीनुसार पदभरतीबाबत कार्यवाही करण्यात येईल. दिव्यांग व माजी सैनिक यांचे व्यतिरिक्त दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा विहित नियमानुसार विचार केला जाईल.

(२) पदभरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांना अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील. तसेच न्यायालयीन वाद उदभवल्यास त्याचे कार्यक्षेत्र पुणे राहील.

(३) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक प्रमाणपत्रे/कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. **ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही व तीच माहिती निवड प्रक्रियेच्या वेळी पडताळणीसाठी विचारात घेतली जाईल**. त्यामुळे उमेदवाराने ऑनलाईन अर्जातील माहिती काळजीपूर्वक/विचारपूर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

(४) शा. नि. क्र. प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दि.०५/०६/२०१४ नुसार मुलाखत (मौखिक परीक्षा) घेण्यात येणार नाही.

भरती प्रक्रियेत पात्र झालेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल.

**(५) शैक्षणिक अर्हता :-**(महापरीक्षा पोर्टलवर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास **धारण केलेली शैक्षणिक अर्हता ग्राहय धरली जाईल)**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | कनिष्ठ लिपिक | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा शासनाने त्याच्याशी समकक्ष म्हणून घोषित केलेली अन्य शैक्षणिक अर्हता.<br>(ब) मराठी टंकलेखनाची किमान ३० श.प्र.मि.वेगमर्यादा व इंग्रजी टंकलेखनाची किमान ४० श.प्र.मि. वेगमर्यादेची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा शासकीय मंडळ अथवा आयटीआयद्वारे घेतली जाणारी परीक्षा उत्तीर्ण. |

५.१ शासन निर्णय क्र.संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ दि.०४/०९/२०१५ नुसार भूकंपग्रस्त व अंशकालीन उमेदवारांना टंकलेखनाची विहीत वेग मर्यादेची (इंग्रजी व मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या कालावधीत व ०२ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात येईल.

५.२ शासन निर्णय क्र. अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ दि. १६/११/२०१६ नुसार दिव्यांग उमेदवारांना टंकलेखनाची विहीत वेग मर्यादेची (इंग्रजी व मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या कालावधीत व ०२ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात येईल.

५.३ शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८ दि. ३०/०८/२०१८ नुसार माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखनाची विहीत वेग मर्यादेची (इंग्रजी व मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या कालावधीत व ०२ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात येईल.

(६) वयोमर्यादा :-

**वयोमर्यादेकरिता महापरीक्षा पोर्टलवर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास असणारे उमेदवाराचे वय विचारात घेतले जाईल.**

६.१ महाराष्ट्र शासन सा.प्र.विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४ /कार्या.१२, दिनांक २५ ऑक्टोबर,२०१६ अन्वये खुला/सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे व कमाल ४३ वर्षे राहील.

६.२ अपंग उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे व कमाल ४५ वर्षे राहील.

६.३ खेळाडू उमेदवारांसाठी खुला/सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी विहित वयोमर्यादेत ५ वर्षाची सूट देण्यात येईल.

६.४ सा.प्र.वि. शासन शुध्दीपत्रक क्र. मासैक १०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ दि. २०/०८/२०१० नुसार माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच विकलांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

६.५ प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे व कमाल ४५ वर्षे राहील.

६.६ शासन निर्णय क्र. अंशका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ दि.०२ जानेवारी २०१९ नुसार, अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल ५५ वर्षे राहील.

६.७ सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ चे निवडणूक कर्मचारी यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

६.८ स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्यास कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

६.९ महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ सेवेतील नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना कमाल वयोमर्यादेची अट ५८ वर्षांपर्यंत शिथिल करुन संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

६.१० मंडळातील न्यायप्रविष्ठ प्रकरणातील न्यायालयीन निर्णयाप्रमाणे रोजंदारी तत्वावर कार्यरत असणाऱ्या, लिपिक/शिपाई उमेदवारांना कमाल वयोमर्यादेची अट ५८ वर्षांपर्यंत शिथिल करुन संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

६.११ शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांना विहित वयोमर्यादेत कोणतीही सूट देण्यात येणार नाही.

(७) **संगणक अर्हता :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/२००१/३९,दिनांक १९/०३/२००३ मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C.किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS- CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ व शासन पूरकपत्र क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९, दिनांक ०८/०१/२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता असणे बंधनकारक आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१ दिनांक १९ मार्च, २००३ अन्वये संगणक अर्हता सेवेत प्रवेश केल्यापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक आहे.

(८) **नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी :-**

८.१ उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तथापि शासन परिपत्रक क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का-३६ दिनांक १० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार अर्ज करण्यासाठी पात्र राहतील.

८.२ सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. मात्र, मराठी व हिंदी विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा वा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार प्रचलित तरतूदीनुसार उपरोक्त परीक्षेतून उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्यास पात्र राहतील.

८.३ विहित वयोमर्यादितील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने भरावेत. अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

(९) **परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम :-**

**संगणक आधारित परीक्षा :-**

| अ.क्र. | विषय | भाषा | स्तर | प्रश्नसंख्या | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | मराठी | १२ वी | ५० | ५० |
| २ | इंग्रजी | इंग्रजी | १२ वी | ५० | ५० |
| ३ | सामान्यज्ञान | इंग्रजी व मराठी | पदवी | ५० | ५० |
| ४ | बुध्दिमापन चाचणी (Logical Ability/ Reasoning Intelligence) | इंग्रजी व मराठी | पदवी | ५० | ५० |

अभ्यासक्रम :-

| Post Name - Junior Clerk | |
|---|---|
| 1 | **Section name - English** |
| | similar words, opposite words, common vocabulary, sentence structure, grammar, use of idioms & phrases & their meaning & comprehension of passage. (Std.12th Level) |
| 2. | **Section name- Marathi** |
| | समानार्थी शब्द, विरूध्दार्थी, शब्द, सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना , व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच, उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे (इ. १२ वी स्तर) |
| 3. | **Section Name- General Knowledge** |
| | चालू घडामोडी (जागतिक तसेच भारतातील), इतिहास विशेषत: महाराष्ट्राचा, महाराष्ट्राचा भूगोल, भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय राज्यव्यवस्था तसेच पर्यावरण (पदवी स्तर) |
| 4. | **Section name- Logical Ability/ Reasoning Intelligence** |
| | उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करू शकतो?, हे अजमावण्यासाठीचे प्रश्न (पदवी स्तर) |

(१०) ऑनलाईन परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व कार्यक्रम :-

ऑनलाईन परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असेल. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. उपरोक्त पदांची ऑनलाईन परीक्षा, पदासंबंधीची शैक्षणिक अर्हता, पदासाठी आवश्यक तांत्रिक ज्ञान, इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी, सामान्यज्ञान आणि बुध्दिमत्ता चाचणी व तत्सम बाबी यावर आधारित असेल.

(११) परीक्षा शुल्क :-

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ लिपिक | रू.५५०/- | रू.३५०/- |

टीप :- माजी सैनिक यांना परीक्षा शुल्क आकारण्यापासून सूट देण्यात येत आहे.

११.१ परीक्षा शुल्क भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहे. (क्रेडिटकार्ड/डेबिट कार्ड/भीम युपीआय/इंटरनेट बॅकिंग इत्यादीद्वारे)

११.२ उमेदवाराला वीजपुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडीत झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही, तर पुन्हा लॉगइन करून, शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

११.३ शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला 'भरणा यशस्वी' असा संदेश मिळेल आणि झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जामध्ये आपोआप अंतर्भूत होईल.

**(१२) ऑनलाईन अर्ज भरण्याची महत्त्वाची सूचना :-**

उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण तसेच, मोबाईल क्रमांक रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल. तसेच, ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना मंडळ कार्यालय जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**(१३) ऑनलाईन अर्ज करण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

**अर्जामध्ये खालील टप्पे आहेत -**

१. नोंदणी २. अर्जावरील माहितीचे पूर्वालोकन

३. ऑनलाईन शुल्क भरणा ४. अर्जाची प्रिंट आऊट

| **अर्ज करण्याची कार्यपध्दती आणि सूचना :-** | |
|---|---|
| १ | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि ई-मेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित ई-मेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रिय करण्यासाठी त्याच्या/तिच्या ई-मेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. (Activation लिंक ही २ दिवसांकरिता active असेल) उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉगइन होता येईल.<br>**टिप :-** USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. |
| २. | उमेदवाराचे नाव, वडीलांचे/पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मूलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |

| | |
|---|---|
| ३. | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रूंदी प्रत्येकी २०० पिक्सल असलेले छायाचित्र स्कॅन करून अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. स्वाक्षरीच्या प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रूंदी १४० पिक्सल असावी. छायाचित्र आणि स्वाक्षरी प्रतिमांचे आकारमान ३ के.बी. ते ५० के.बी. च्या दरम्यान असावे.<br>(टिप:-उमेदवाराने अलिकडील छायाचित्र/फोटोग्राफ अपलोड करणे आवश्यक आहे.) |
| ४. | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरूपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्हीही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इत्यादीसह माहिती भरावी. |
| ५. | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास, ड्रॉप डाउनमधून उमेदवाराने आपला जात प्रवर्ग निवडावा. उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्याआधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे.<br>ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातीचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भारण्याची दक्षता उमेदवारांनी स्वत: घ्यावी. |
| ६. | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे, त्यांनी त्यासंबंधी माहिती भरावी. तसेच, उमेदवाराने आधार क्रमांक/आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती दयावी. समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती दयावी लागेल. |
| ७. | तसेच, मराठी भाषेतील प्राविण्य, एमएस-सीआयटी प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास), प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू, अंशकालीन, अनाथ यासंबंधीची माहिती दयावी लागेल. |
| ८. | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे. तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| ९. | एकदा शैक्षणिक तपशील प्रविष्ठ केला की अर्जदारास पुढे या बटनावर क्लिक करावे लागेल, त्या बटनावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटन क्लिक केल्यास, मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| १०. | आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल.<br><table><tr><td>Sr.No.</td><td>Post Name in English</td><td>Post Name in Marathi</td></tr><tr><td>1</td><td>Junior Clerk</td><td>कनिष्ठ लिपिक</td></tr></table> |
| ११. | त्यानंतर उमेदवारास पदासाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |
| १२. | उमेदवार नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरिता ३ प्राधान्य क्रम निवडू शकतो. तीनही पसंती क्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रांपैकी **परीक्षा** केंद्र नेमून देण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १३. | उमेदवाराने सर्व नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने (इंटरनेट बॅकींग, क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/भीम युपीआय इत्यादी) आवश्यक परीक्षा शुल्क भरणा करावे. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाउनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. |
| १४. | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री १२.०० वाजल्या नंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. |
| १५. | जर कोणत्याही उमेदवाराने एक पेक्षा अधिक लॉगइन आयडीसह नोंदणी केली असेल, तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकिट, परीक्षेस उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे शुल्क परत केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री क्रमाक १८००३०००७७६६ वर संपर्क साधा.<br>**नोंद:- नोंदणीमधील तपशील जसे की वापरकर्ता (युजर नेम), ईमेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), पसंतीचे स्थान १/२/३, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र आणि स्वाक्षरी, शैक्षणिक पात्रतेचा तपशील इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.** |
| (१४) अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन :- | |
| १. | युजर नेम आणि पासवर्ड वापरून लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| २. | अर्ज प्रिंट करण्यासाठी “प्रिंट प्रिव्हयू” या पर्यायावर क्लिक करा.<br>**नोंद:- उमेदवाराने आपला पीडीएफ स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेशपत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत: जवळ जतन करून ठेवावा.** |
| (१५) महत्त्वाच्या सूचना :- | |
| १. | उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही. |
| २. | परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकिय किंवा इतर कारणांसाठी देखील) स्विकारली वा मान्य केली जाणार नाही. उमेदवाराने प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी. |
| ३. | उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंती क्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रांपैकी परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल. |
| ४. | उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही. |

(१६) सर्वसाधारण सूचना :- (कार्यपध्दती, अटी व शर्ती)

१६.१ ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परीपूर्ण भरून विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षाची रूपरेषा/ वेळापत्रक/ परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इत्यादीबाबतची माहिती वर दिलेल्या (विबसाईट) वर उपलब्ध राहिल. यासंबंधी स्वतंत्र प़त्रव्यवहार केला जाणार नाही. सबब, सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाउनलोड करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल.

१६.२ ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे ऑनलाईन परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे, असे नाही.

१६.३ निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही यथानियम करण्यात येईल, तसेच, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाब आणल्यास, अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास, कोणतीही लेखी पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून, त्याच्याविरूध्द यथानियम कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१६.४ उमेदवारास ऑनलाईन परीक्षा व कागदपत्रे पडताळणी इत्यादीकरिता स्वखर्चाने दिलेल्या ठिकाणी व दिलेल्या वेळेत यावे लागेल.

१६.५ उमेदवारांना त्यांचे गुण वैयक्तिकरित्या पडताळणी करण्याकरिता प्रश्नांची उत्तरतालिका परीक्षा झालेल्या दिवसापासून साधारणपणे कार्यालयीन कामकाजाच्या ०३ दिवसांच्या कालावधीमध्ये उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

१६.६ ऑनलाईन परीक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परीक्षेचे प्रवेशपत्र उक्त संकेतस्थळावरून स्वत: डाउनलोड करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही माध्यम/पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही.

१६.७ उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे गृहित पात्रतेनुसार कोणतेही कागदपत्रे पूर्व तपासणी/छाननी न कारता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार **अंतरिम यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल.** सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. उपरोक्त पदासाठी निर्धारित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचा संपूर्ण अधिकार मंडळाकडे

राखून ठेवण्यात आलेला आहे. याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१६.८ निवड झालेल्या उमेदवारांच्या सेवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिपत्याखालील राज्यातील कोणत्याही कार्यालयात नियुक्तीस व बदलीस पात्र असतील.

## (१७) अंतिम निवड :-

पात्र उमेदवारांचा अंतरिम तसेच अंतिम निकाल मंडळाच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

१७.१ ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करण्यात येईल. मात्र निवड यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेत एकूण गुणांच्या **किमान ४५ टक्के गुण** प्राप्त करणे आवश्यक राहील.

१७.२ एकाच स्थानासाठी (पोझिशन) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक प्रानिमं/२१५/(प्र.क.५५)१५/१३-अ मंत्रालय, मुंबई दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१५ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे निवड यादी केली जाईल. तसेच शासन निर्णयानुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्राधान्य देण्यात येईल.

## (१८) विशेष सूचना :-

१८.१ अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना मंडळाचे सेवा प्रवेश नियम व सर्व सेवा शर्ती लागू राहतील.

१८.२ मंडळ नियमावलीतील तरतुदीनुसार अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना राज्य मंडळ व राज्य मंडळाच्या अधिपत्याखालील कोणत्याही विभागीय मंडळांत नियुक्ती देण्यात येईल.

१८.३ मंडळ नियमावलीतील तरतुदी व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दिपत्रकांमधील तरतुदी उमेदवारास बंधनकारक राहतील.

१८.४ शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक : अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१/१०/२००५ नुसार दिनांक ०१/११/२००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे म. ना.से. (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व म.ना.से.(निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही.

१८.५ शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क. १७/२०००/१२ दिनांक २८/०३/२००५ व शासन परिपत्रक, एसआरव्ही-२०००/प्र.क.१७/२०००/१२ दिनांक ०१/०७/२००५ मध्ये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब, क व ड मधील सेवा प्रवेशासाठी

प्रतिज्ञापत्र नमूना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

१८.६ मंडळ सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने सहा महिन्यांच्या आत वैद्यकियदृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रूग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्याकडून मंडळ सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१८.७ मंडळ सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांची नेमणूक त्यांचे पूर्वचारित्र्य व वर्तणूक (पोलीस इन्क्वायरी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहिल व तसा अहवाल आक्षेपार्ह असल्यास, कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांना मंडळ सेवेतून कमी करण्यात येईल.

१८.८ ज्या उमेदवारांची सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण/प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग/जिल्हा सैनिक बोर्ड इ. कार्यालयांमध्ये नावे नोंदविलेली आहेत. त्याच प्रमाणे ज्या उमेदवारांची सदर पदांसाठी सेवायोजन कार्यालयाकडून शिफारस करण्यात आलेली आहे, अशा उमेदवारांनीही या पदासाठीच्या परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच परीक्षेसाठीचे विहीत शुल्क भरणे आवश्यक राहील.

(१९) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र -

१९.१ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (एसईबीसी) आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रवर्गामधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याचे सन २०१८-२०१९ चे मूळ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) तसेच जात प्रमाणपत्र इत्यादीची मूळ कागदपत्रे व साक्षांकित प्रती पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा, त्यांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

१९.२ ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासणीच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. जात वैधता पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर सदर उमेदवाराच्या नियुक्तीचे आदेश रद्द करण्यात येतील.

(२०) **समांतर आरक्षण:-** समांतर आरक्षणांतर्गत महिला, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन व अनाथ यांचेसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या प्रवार्गातील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत. उर्वरित पदे त्या त्या प्रवर्गातील समांतर आरक्षणाव्यतिरिक्त आहेत. तसेच समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०१२/प्र.क्र१६/१२/१६अ दि. १३/०८/२०१४ आणि सा.प्र.वि., शासन निर्णय क्र. १११८/प्र.क्र.३९/१६-अ

दि. १९/१२/२०१८ तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२०.१ **महिला आरक्षण**:- महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक ८२/२००१, म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का२ दि.२५/०५/२००१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णया नुसार राहील. तसेच शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र.१९१/१७/ कार्य-२ दि.१५/१२/२०१७ नुसार अमागासवर्गीय (खुल्या) प्रवर्गातील **महिला समांतर आरक्षणसाठी** नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र पडताळणी आवश्यक राहील. जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकाला महिला उमेदवाराची वैवाहिक स्थिती विचारात घेवून तिचे सन २०१८-१९ चे मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२०.२ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (एसईबीसी) तसेच खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

२०.३ खुला आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांनी महिलांसाठीच्या राखीव पदाकरिता अर्ज करताना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-यांचे सन २०१८-१९ चे मूळ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) तसेच, प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

२०.४ महिला आरक्षणाचे लाभार्थी उमेदवारांच्या प्रमाणपत्राची फेरतपासणी आयुक्त, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचेमार्फत करण्यात येईल.

२०.५ **खेळाडूंसाठी आरक्षण** :- अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२ दिनांक : ०१ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक दि. १८/०८/२०१६ व शासन निर्णय, क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. १०/१०/२०१७ आणि शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२ दि. १५/११/२०१७ व शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र. क्र.६८/क्रीयुसे-२ दि. १६/११/२०१७ आणि या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२०.६ **क्रीडा विषयक अर्हता** :-

२०.६.१ खेळाडू समांतर आरक्षणासाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

२०.६.२ राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर संबंधित खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलम्पिक असोशिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.

२०.६.३ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा तसेच राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमधील (अश्वमेध) वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय किंवा सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त खेळाडू.

२०.६.४ भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय किंवा सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त खेळाडू.

२०.६.५ भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धातील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त खेळाडू. तथापि प्रत्येक गटात नियुक्तीसाठी स्पर्धा असेल तर वरिष्ठ प्राविण्यास प्राधान्य देण्यात येईल.

२०.६.६ भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राज्य व राष्ट्रीय स्तरावर स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय किंवा सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त खेळाडू.

२०.६.७ अदिवासी विकास विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त करणारे खेळाडू.

२०.६.८ संबंधित पॅरा-ऑलम्पिक खेळ संघटनेने आयोजित केलेल्या पॅरा-ऑलंम्पिक क्रीडा स्पर्धांतील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त खेळाडू.

२०.६.९ अपंग कल्याण विभागामार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त खेळाडू.

२०.६.१० जाहिरातीच्या दिनांकापर्यंतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले क्रीडा स्पर्धेचे प्रमाणपत्र सादर करावे. विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील प्रमाणपत्र पडताळणीनंतरच नियुक्तीचे आदेश देण्यात येतील. उपरोक्त २०.६.१ ते २०.६.९ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कब्बडी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळच ५ टक्के खेळाडू समांतर आरक्षणासाठी पात्र असतील.

**२०.७ अनाथ आरक्षण:-** शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्रमांक : अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दि. ०२/०६/२०१८ मधील तरतुदीनुसार अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदासाठी अर्ज करताना उमेदवाराकडे महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र उमेदवाराने कागदपत्र पडताळणीचे वेळी पडताळणी समितीस उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या उमेदवाराची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास उमेदवाराने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेरतपासणी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांचेमार्फत करण्यात येईल.

२०.८ **भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त आरक्षण**:- उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. विकाक-२२१५/प्र.क्र. ३३७/१६-अ दि. ०४/११/२०१६ मधील तरतूदीनुसार भूकंपग्रस्तांसाठी राखीव असलेल्या २ टक्के पदांवर नियुक्तीसाठी ज्या कुटुंबातील व्यक्तीचे भूकंपात निधन झाले आहे किंवा ज्यांचे घर पूर्णपणे कोसळले होते, त्यामुळे शासनाने त्यांना नवीन घर बांधून दिले, अशा व्यक्तींचे पाल्य नियुक्तीसाठी पात्र ठरतील.

२०.९ **दिव्यांग आरक्षण**:- दिव्यांग या प्रवार्गातील उमेदवाराचे दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असून, शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.आप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दि. १४/०९/२०१८ मधील आदेशानुसार विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. शासन निर्णय क्र. कृ.षी.आ १२०४/प.क्र.३८७(१)/१६-(ए) दि. २४/०१/२०११ व शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र. ११४/१६ अ दिनांक २९/०५/२०१९ नुसार १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता. ३) अस्थिव्यंग/मेंदूचा पक्षघात/कुष्ठरोग मुक्त /शारीरिक वाढ खुंटणे/आम्ल हल्लाग्रस्त/स्नायु विकृती ४) स्वमग्नता/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता /विशिष्ट शिक्षण अक्षमता/मानसिक आजार ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे उमेदवार. या दिव्यांग प्रकारांपैकी किमान ४० टक्के कायमस्वरुपी दिव्यांगत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. **(तथापि दिव्यांगाकरीता मंडळाने सुनिश्चित केलेल्या धोरणानुसार कनिष्ठ लिपिक पदासाठी स्वमग्नता/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता/विशिष्ट शिक्षण अक्षमता/मानसिक आजार या दिव्यांग प्रकारातील उमेदवार पात्र राहणार नाहीत.)** दिव्यांग उमेदवारांना त्यांच्या दिव्यांगत्वामुळे ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी सहाय्यकाची आवश्यकता असल्यास तसा उल्लेख त्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये करणे आवश्यक आहे. जाहिरातीमध्ये उपरोक्त पदांवर सरळसेवेने दिव्यांगांच्या नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या पदांची यादी निर्देशित केलेली असून त्या अनुषंगाने सदरील पदभरती करण्यात येईल. कनिष्ठ लिपिक पदासाठी पात्र ठरणाऱ्या दिव्यांग प्रकारानुसारच उमेदवाराची अंतिम निवड निश्चित करण्यात येईल. उमेदवार ऑनलाईन परीक्षा देण्यास सक्षम नसल्यास, परीक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार पुर्वपरवानगीने सहाय्यकाची मदत घेणेबाबत व पुर्व परवनगीने अनुग्रह कालावधी मिळणेबाबतची तरतूद आहे. ज्या दिव्यांग उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना सहाय्यक आवश्यक असल्याचा विकल्प दिलेला आहे त्यांनी सहाय्यकाची व्यवस्था स्वत: करावयाची आहे व फक्त त्यांनाच परीक्षेच्यावेळी सहाय्यक स्वत: सोबत घेऊन येता येईल. ऑनलाईन अर्ज करतेवेळी सहाय्यक हवा असल्याचा उल्लेख केलेला नसल्यास ऐनवेळी सहाय्यकाची मदत घेता येणार नाही. सहाय्यकासाठी घोषणापत्राचा नमूना उमेदवारांना त्यांच्या प्रवेशपत्रासोबत डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरच्या घोषणापत्राचा नमूना उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित विभागीय

मंडळ कार्यालयातील विभागीय सचिव यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह परीक्षेच्या वेळी स्वत: सोबत घेऊन येणे व सादर करणे आवश्यक राहील.

शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. अपंग-१००७/प्र.क्र.६१/सुधार-३ दि. २०/०४/२००७, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र. १०३(भाग-३)/१६-अ दि. १९/०३/२०१० अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने निवड करण्यात येईल व निवड केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल, त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यात येईल.

२०.१० **अंशकालीन आरक्षण**:- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दि. २७/१०/२००९ नुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना गट क मधील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यामध्ये १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यानुसार अंशकालीन उमेदवारांनी सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व सेवा योजन कार्यालयामध्ये या अनुभवाची नोंद घेतल्याबाबतचे सेवा योजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२०.११ **माजी सैनिक आरक्षण**:- माजी सैनिक आरक्षणासाठी केवळ माजी सैनिक उमेदवारच पात्र असतील माजी सैनिकांचे पाल्यास सदर आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही.

२०.११.१ शासन परिपत्रक क्र. न्याय-२०१४/कोर्ट-९/(प्र.क्र.२४४/१४)/२८ दि. ११/०९/२०१४ नुसार माजी सैनिकांना देण्यात येणाऱ्या सोई-सुविधा, केंद्रीय हत्यारी पोलीस दलातील (Ex-CAPF) कर्मचाऱ्यांना लागू नाहीत.

२०.११.२ शासन निर्णय क्र. आरटीए-१०८२/२३२७/सीआर-६३/१६-अ दि. ०५/१०/१९८९ नुसार माजी सैनिक उमेदवारांना विहित शैक्षणिक अर्हतेमध्ये सूट देण्यात येईल.

२०.११.३ शासन निर्णय क्र. आरटीए-१०९०/६२/प्र.क्र.२२२/९१/२८ दि. ३०/१२/१९९१ नुसार माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

**(२१) उमेदवाराची गुणवत्तेनुसार नियुक्तीसाठी निवड झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशील :**

२१.१ शैक्षणिक/तांत्रिक अर्हता धारण करीत असल्याबाबतचे संबंधित शासनमान्य संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्राची प्रत.

२१.२ जन्मतारखेच्या पुराव्याबाबत जन्म दाखल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रमाणपत्राची प्रत.

२१.३ सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व असल्यास जात वैधता प्रमाणपत्र प्रती.

२१.४ महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

२१.५ प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्राची प्रत.

२१.६ लागू असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या अद्ययावत नियमानुसार नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची प्रत.

२१.७ दिव्यांग व्यक्तींचे बाबतीत उपरोक्त अ.क्र. २०.९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्राची प्रत.

२१.८ परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत व आवेदनपत्राची प्रत.

२१.९ माजी सैनिक उमेदवाराने सशस्त्र दलात केलेल्या सेवेबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत.

२१.१० अंशकालीन उमेदवारांनी सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये तीन वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयामध्ये या अनुभवाची नोंद घेतल्याबाबत सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

२१.११ खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्राची प्रत.

२१.१२ अनाथ असल्याबाबत शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्राची प्रत.

२१.१३ इतर अनुषंगिक आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रती.

२१.१४ खालील दिलेल्या नमुन्यातील लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र.

(२२) उपरोक्त नमूद विविध शासन निर्णय, परिपत्रके, तरतूदी याशिवाय सदर भरतीप्रक्रियेशी संबंधित वेळोवेळी निर्गमित झालेले/होणारे सुधारित विविध शासन निर्णय, परिपत्रके, तरतूदी या पदाच्या भरतीप्रक्रियेस लागू राहतील.

******

सही/-
नोडल अधिकारी
तथा
सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

सही/-
नियुक्ती प्राधिकारी
तथा
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील

प्रतिज्ञापत्राचा नमुना - अ

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीमती/कुमारी ----------------------------------------- श्री. ------------------------------------------------- यांचा मुलगा/ यांची मुलगी/ यांची पत्नी वय ------ वर्षे, राहणार --------------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१. मी --------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला ----------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------ आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-----------------------

दिनांक :-----------------------

उमेदवाराची सही

(उमेदवाराचे नाव :------------------)

***************